नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०५/२०२५ (बुधवार)**

---


## मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखडा उपक्रमामध्ये पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण यांची महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांकाने निवड झाल्याने मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतुन प्रशासनाला गतीमानता येण्यासाठी 'क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा हा उपक्रम सुरू करण्यात आला. सदर उपक्रम हा दिनांक ०७ जानेवारी २०२५ ते दिनांक १६ एप्रिल २०२५ दरम्यान राबविण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांचा समावेश होता. या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेचे मुल्यमापन हे **'भारतीय गुणवत्ता परिषद' (Quality Council Of India)** या संस्थे मार्फत करण्यात आले. या उपक्रमामध्ये राज्यातील सर्व पोलीस अधिक्षक कार्यालयामधुन **पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा** यांची **द्वितीय क्रमांकाने निवड झाली.**

**आज दिनांक ०७/०५/२०२५ रोजी मुंबई येथे पार पडलेल्या विजेत्यांच्या गुणगौरव सोहळयामध्ये** मा. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी **मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि त्यांच्या सर्व चमुचे हार्दीक अभिनंदन केले.** सदर समारंभात मा. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मा. श्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवुन पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी करीता गौरविण्यात आले. **मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक तथा प्रभारी पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सदर**

कार्यक्रमाला उपस्थित राहुन पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण च्या वतीने प्रशस्तीपत्र स्वीकारले.





सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## प्रशस्तीपत्र

राज्यामध्ये ''१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम'' दिनांक ७ जानेवारी, २०२५ ते दिनांक १६ एप्रिल, २०२५ या कालावधीत राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक कार्यालयांमधून **पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण)** यांची **द्वितीय** क्रमांकाने निवड झाली आहे. आपल्या कार्यालयाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आपले व आपल्या सर्व चमूचे मन:पूर्वक अभिनंदन !

"१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम" अंतर्गत राज्यस्तरावर केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल **श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण)** यांना हे प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येत आहे.

**(देवेंद्र फडणवीस)**
**मुख्यमंत्री**

**(अजित पवार)**
**उप मुख्यमंत्री**

**(एकनाथ शिंदे)**
**उप मुख्यमंत्री**

स्थळ: मुंबई
दिनांक: ७ मे २०२५

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १५ जनावरांची सुटका,एमआयडीसी बोरी पोलसांची कामगिरी २ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :—दिनांक ०७/०५/२०२५ रोजी **एमआयडीसी बोरी** पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नागपुर कडुन सलाईदाभा मार्गे हैदराबाद येथे आयसर वाहन क्रमांक **एम. एच. ४० सी.एम. २०२४** मध्ये अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **गार्डन चौक येथे** नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान आयसर वाहन क्रमांक **एम. एच. ४० सी.एम. २०२४ मिळुन आले.** वाहन थांबवून वाहन चालक आणि क्लिनर यांना त्याचे नाव व पत्ता विचारले असता **चालक नामे मोहम्मद शफि अब्दुल सत्तार, वय ३५ वर्ष, रा. टेकानाका, नविन वस्ती चिराग अली चौक,नागपुर शहर आणि क्लिनर नामे गुलाम रसुल मोहम्मद आलेनबी अंसारी , वय ४० वर्षे,रा टेकानाका, कमल कॉलनी नागपुर अशी माहीती प्राप्त झाली** .तसेच त्यांना वाहनात काय आहे? असे विचारले असता तो उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याने पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी असता वाहनाच्या डाल्यामध्ये त्यामध्ये **१५ गोवंश जनावरे** (बैल) असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, गळयाला दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. चालकाला वाहन मालकाचे नाव विचारले असता आयसर वाहन क्रमांक **एम. एच. ४० सी.एम. २०२४ चा मालक नामे मोहम्मद शफी मोहम्मद शब्बी कुरेशी, वय ४२ वर्षे, रा टेकाणी वस्ती, आझाद नगर, नागपुर याच्या संमतीने नमुद जनावरांना गोंदीया येथुन भरून हैदराबाद येथे कत्तलीकरीता घेवुन जात आहे** अशी माहीती मिळाली. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन** आयसर वाहन क्रमांक **एम. एच. ४० सी.एम. २०२४ किंमती २०,००,०००/— रू. व १५ गोवंश जनावरे** (बैल) **किंमती १,५९,००० /— रू. असा एकूण किंमती २१,५९,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**आरोपी नामे १. चालक—मोहम्मद शफि अब्दुल सत्तार, वय ३५ वर्ष, रा. टेका,नाका, नविन वस्ती चिराग अली चौक,नागपुर शहर , २. क्लिनर —गुलाम रसुल मोहम्मद आलेनबी**

**अंसारी , वय ४० वर्षे,रा टेकानाका, कमल कॉलनी नागपुर आणि ३. वाहन मालक— मोहम्मद शफी मोहम्मद शब्बी कुरेशी, वय ४२ वर्षे, रा टेकाणी वस्ती, आझाद नगर, नागपुर यांच्या विरूध्द कलम ५, ५अ, ५ब, ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. वाहन चालक आणि क्लिनर आरोपीस अटक करण्यात आली आहे.**




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ११ जनावरांची सुटका,मौदा पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :—दिनांक ०७/०५/२०२५ रोजी मौदा पोलीस ,पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा

कडुन नागपुर कडे **टाटा योध्दा वाहनामध्ये** अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **एन.एच ५३ रोडवर** मारोडी शिवारात यादव पेट्रोलपंप समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **टाटा योध्दा वाहन क्रमांक एम. एच. ३० बी.डी ५२०७ येताना दिसले**. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत ईशारा केला असता वाहन चालकाने वाहन रोडच्या कडेला लावुन त्याचा साथीदार वाहक याच्या सह पोलीसांना थांबलेले पाहुन अंधाराचा फायदा घेवुन दुरूनच पळ काढला. पोलीसांनी वाहनाजवळ जावुन त्याची तपासणी केली असता त्यामध्ये **११ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक टाटा योध्दा वाहन क्रमांक एम. एच. ३० बी.डी ५२०७ किंमती ७ ,००,०००/— रूपये. व ११ गोवंश जनावरे किंमती १,१०,००० /— रूपये असा एकुण किंमती ८,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन ध्यान फाउंडेशन गौशाळा ,खरबी ,जि. भंडारा येथे दाखल करण्यात आले आहे.**

**टाटा योध्दा वाहन क्रमांक एम. एच. ३० बी.डी ५२०७ चा चालक आणि वाहक याच्या विरूध्द कलम ११(१) (ड) (ई) (फ) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने